# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.11.2024** **वार – शनिवार**

---

**रक्त**

पुण्यात गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये विविध कारणांमुळं रक्तदान शिबिरांचं प्रमाण कमी झालं आहे. त्यामुळं पुणे शहरात रक्ताचा तुटवडा जाणवत असून, रुग्णांची आणि नातेवाइकांची धावपळ होत आहे. रक्तपेढ्यांमध्ये दररोज अंदाजे 40 ते 50 रक्त पिशव्यांची मागणी असते. त्यांपैकी साधारणपणे 30 पिशव्यांची मागणी पूर्ण होत आहे. नियोजित शस्त्रक्रियांसाठी दोन-तीन दिवसांत रक्त उपलब्ध करून देण्याचं सांगितलं जात आहे. ससून, वायसीएम, औंध जिल्हा रुग्णालय, जहांगीर, केईएम, रुबी हॉल अशा अनेक रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा आहे.

**मतदार**

पिंपरी विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या वतीने मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदान जनजागृती करण्यात येत आहे.  त्याचाच एक भाग म्हणून आज आकुर्डी इथल्या जैन स्थानकात मतदान जनजागृती करण्यात आली.  यावेळी  साध्वी डॉक्टर राजश्रीजी, डॉक्टर मेधाश्रीजी यांच्या उपस्थितीत शंभर टक्के मतदान करण्याची शपथ जैन बांधवांनी घेतली. मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी सोसायट्या, शैक्षणिक संस्था, गर्दीची ठिकाणं, विविध समाज मंदिरं, प्रवासी वाहतुक संस्था यासह सोशल मिडीयाद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत असल्याचं निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी सांगितलं.

**संकल्प**

कसबा मतदारसंघात आज महायुतीचा विजयसंकल्प मेळावा मोठ्या उत्सहात संपन्न झाला. कसबा मतदारसंघात महायुतीच्या विजयासाठी आणि राज्यात महायुतीची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा संकल्प या मेळाव्यात करण्यात आला. हेमंत रासने  यांना कसब्यातील जनता त्यांना नक्की विधानसभेत पाठवेल असा विश्वास यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.

**पदयात्र**

सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी करून प्रवास गतिमान व्हावा या उद्देशाने एकात्मिक वाहतूक आराखड्याची नियोजनबद्ध अंमलबजावणी करीत असल्याची माहिती पर्वती विधानसभा मतदारसंघातील  महायुतीच्या उमेदवार आमदार माधुरी मिसाळ यांनी  दिली. राजाराम पूल, नवशा मारुती, सरीता नगरी, दत्तवाडी, पानमळा या परिसरात मिसाळ यांच्या प्रचारार्थ आज आयोजित पदयात्रेच्या वेळी त्या बोलत होत्या. राजाराम पूल चौकातील उड्डाणपुलांचं 75 टक्के काम पूर्ण झालं आहे, उर्वरित काम मार्च 2025 पर्यंत पूर्ण होईल असंही मिसाळ यांनी सांगितलं.

**कँटोन्मेंट**

कँटोन्मेंटच्या विकासासाठी लोकांनी रमेश बागवे यांच्या पाठीशी राहून त्यांना भरघोस मतांनी विजयी करावं, असं आवाहन विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात यांनी  आज केलं. बागवे यांच्या मुख्य निवडणूक कचेरीचं उद्घाटन थोरात आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झालं. महाविकास आघाडीतील सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मार्गदर्शन करून विजयाबद्दल विश्वास व्यक्त केला.

**चंद्रकांत पाटील**

कोथरूड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी आज सकाळी तात्यासाहेब थोरात उद्यानात जाऊन सकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला. पाटील यांनी मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी सर्वांनी अवश्य मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असं आवाहन केलं.

**शिरोळे**

पुण्यातील छत्रपती शिवाजीनगर मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांनी औंधरोड भागातील सर्व मंडळातील युवकांसोबत बैठक घेऊन त्यांना केलेल्या कामांची माहिती दिली.

**सभा**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा मंगळवारी पुण्यात होणार आहे. या सभेसाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव शहरात ड्रोन कॅमेरे,  पॅराग्लाडरच्या उड्डाणास बंदी घालण्यात आली असून, आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिला आहे.

**आयुर्वेद**

आयुर्वेद या प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक काळात सातत्यपूर्ण संशोधन, नवकल्पना, जागतिक भागीदारी आणि कौशल्यपूर्ण विपणनाची जोड देणं आवश्यक असल्याचं मत तेलंगणचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज पुण्यात व्यक्त केलं.
भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कार सोहळा आणि आयुर्वेद संभाषा या विशेष कार्यक्रमात वर्मा बोलत होते. यावेळी वैद्यराज विलास नानल यांना आयुर्वेद रत्न सन्मान मरणोत्तर प्रदान करण्यात आला. आशुतोष नानल यांनी तो स्वीकारला. वैद्यराज सदानंद सरदेशमुख, वैद्यराज समीर जमदग्नी, वैद्य श्रुती जमदग्नी यांना जीवनगौरव पुरस्कारानं, तर वैद्य विनय वेलणकर, वैद्य रामदास आव्हाड आणि वैद्य विनायक टेंभुर्णीकर यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**फुटबॉल**
धुळे इथं सुरु असलेल्या आंतरजिल्हा फुटबॉल कनिष्ठ गटाच्या मुलांच्या स्पर्धेत गतउपविजेता पुणे संघानं अंतिम फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत  पुण्याने अहमदनगरवर 3-2 असा विजय मिळवला. अंतिम फेरीत पुण्यासमोर गतविजेता मुंबई जिल्हा संघाचं आव्हान आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**